“शिक्षण सेवक” व “प्राथमिक शिक्षक” या पदावर केलेली पूर्वसेवा “पोलीस उप निरीक्षक” पदाच्या सेवेस जोडून देणेबाबत...

श्री.विकास भगवान कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-११२६/प्र.क.५२/पोल-५अ**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- २८ एप्रिल २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२.०१.२००७
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/९६/सेवा-४, दि.३.११.२००८
३) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००९/३२/सेवा-४,दि.१८.८.२००९
४) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. सेनिवे १००८/प्र.क्र.१६/सेवा ४, दि.१९.०७.२०११
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.१६/सेवा ४,दि. ३.०८.२०११
६) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.सेनिवे-१००८/१६/सेवा-४,दि. २८.०९.२०१२
७) विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्रमांक-DGP-D50119/3/2024-DESK 5, दि.१०.११.२०२५

प्रस्तावना:-

श्री. विकास भगवान कोकाटे हे दि.१२.१२.२०१२ रोजी पोलीस उपनिरीक्षक पदावर रुजू झाले. विशेष पोलीस महानिरिक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र यांच्या दि.१६.०८.२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्री. कोकाटे यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमीतपणे सामावून घेण्यात आले आहे. श्री. विकास भगवान कोकाटे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती होण्यापूर्वी ते दि.०६.०८.२००५ ते दि.३०.०९.२०१२ या कालावधीत जिल्हा परिषद, पुणे व जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत “शिक्षणसेवक” व “प्राथमिक शिक्षक” या पदावर कार्यरत होते.

श्री. विकास भगवान कोकाटे, यांची “शिक्षण सेवक” व “प्राथमिक शिक्षक” पदाची पूर्वसेवा “पोलीस उप निरीक्षक” पदाच्या सेवेस जोडून देणेबाबतचा प्रस्ताव पोलीस उपमहानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांनी दि.१०.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार श्री. कोकाटे यांची पूर्वसेवा जोडून देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

श्री. विकास भगवान कोकाटे हे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१२.०१.२००७ मधील परिच्छेद

क्रमांक २ व वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१८.०८.२००९ मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या (i) ते (iv) येथील अटींची पूर्तता करत असल्याचे दिसून येते. सबब, श्री. विकास भगवान कोकाटे यांची दि.०६.०८.२००५ ते ०५.०८.२००८ या कालावधीतील "शिक्षणसेवक" व दि.०६.०८.२००८ ते दि.३०.०९.२०१२ या कालावधीतील "प्राथमिक शिक्षक" पदावरील सेवा, दि.१२.१२.२०१२ पासूनच्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या सेवेस निवृत्तीवेतनाच्या प्रयोजनार्थ जोडून देण्यास तसेच, श्री. कोकाटे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम, १९८२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. श्री. विकास भगवान कोकाटे यांच्या "शिक्षणसेवक" व "प्राथमिक शिक्षक" या पदाववरील सेवा व " पोलीस उपनिरीक्षक" पदावरील सेवा या दोन सेवांमधील दि.०१.१०.२०१२ ते दि.११.१२.२०१२ इतका सेवाखंड महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ४८ (१) नूसार क्षमापित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२८१२०४५०४१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=F88A2DF366DBF702EDA9179BFDD100F151490E691798947C7F6D1B8CF0DAB7D6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2026.04.28 12:05:50 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
३. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. पोलीस अधीक्षक, नांदेड
६. महालेखापाल (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ , मुंबई/नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
८. श्री. विकास भगवान कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत)
९. निवडनस्ती( पोल-५अ)